


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# वारली चित्रकला – एक आविष्कार

**सुनिल दादाभाऊ मोरे,**
**डॉ. दिनकर रावजी मुरकुटे**
मराठा विद्या प्रसारक समाजाचे,
न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,
अहमदनगर.

- **प्रस्तावना**

अतिप्राचीन काळापासून माणसाने विविध कलांना आपलेसे केले. त्यांची जोपासना केली. त्यापैकीच एक कला म्हणजे वारली चित्रकला. या कलेला खूप मोठा इतिहास आहे. इ. स. पूर्व दहा हजार वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील भीमबेटका येथील गुहांमध्ये रेखाटलेली चित्रे याची साक्ष देतात. प्राणी व मानवाकृती भौमितिक आकारातून ती साकारत आहे. हीच कला महाराष्ट्रातील विशेषत: ठाणे-पालघर या जिल्ह्यातील आदिवासी समाज म्हणजे वारली समाजाने ती जतन करून ठेवली आहे. आज ही कला महाराष्ट्राच्या सांस्कृतिकतेचा, अस्मितेचा अविभाज्य भाग बनला आहे, तसेच वारली समाजाच्या संस्कृतीचा तो आरसा आहे.

वारली चित्रकला ही आज सातासमुद्रापार जाऊन पोहचली. ‘जिव्या सोमा म्हसे’ यांनी खऱ्या अर्थाने ही चित्र संस्कृती जगासमोर आणली. आज ती कॅनव्हासवर रेखाटली जाते. परंतू वारली समाजाच्या या वारली चित्रांचा कॅनवास म्हणजे त्यांच्या झोपडीची भिंत. शेणामातीने सारवलेल्या भिंतीवर चित्रे रेखाटले जातात. शेण व तांबड्या मातीमुळे भिंतीवर तपकिरी रंगाचा पोत तयार होतो. त्यावर तांदळाच्या पिठात मोहाच्या झाडाचा चिक टाकून बांबूच्या किंवा खजुराच्या काडीने चित्रे काढली जातात. आज कॅनव्हास आणि पारंपारिक साधनांमध्ये अनेक बदल होत गेले, परंतु त्यातील प्रतीके मात्र तशीच आहे. या प्रतीकांमधून काय सांगितले आहे, याचा बोध मात्र बऱ्याच जणांना नसतो. वारली चित्रकलेत सूर्य, चंद्र, स्वस्तिक, ग्रहणे, ग्रह व तारे, तारपा, उल्का, ताडी काढणारा भंडारी, लग्न चौक इत्यादी प्रतिकांचा वापर केलेला असतो. या प्रतीकांचा काय अर्थ आहे किंवा त्यातून चित्रकाराला काय सांगायचे आहे याचे आकलन व्हावे म्हणून वारली चित्रकलेचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

- **उद्देश**

१. वारली चित्रकलेची संकल्पना आणि महत्त्व समजणे.

२. वारली चित्रकला आणि तिचा वारली जमातीशी असलेला संबंध यांचा अभ्यास करणे.

३. वारली चित्रकलेतील चित्रात्मक शैलीचा बोधात्मक अभ्यास करणे.

- **संशोधन पद्धती**


सदर विषयाचा अभ्यास मुख्यतः प्राथमिक स्रोतांवर आधारित आहे. आदिवासी भागातील माझे निरीक्षण तसेच आदिवासी वारली चित्रकार यांच्याशी संवाद साधून आणि क्षेत्रभेटी घेऊन सदर विषयावर लेखन करण्याचा प्रयत्न आहे. तसेच दुय्यम स्रोत म्हणून विविध संशोधन प्रकाशने, पुस्तके, माहितीपट, जर्नल्स, लेख यांचा आधार घेण्यात आलेला आहे. ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतींचाही संशोधन करताना वापर केला आहे.

- **वारली कलेचा इतिहास**

वारली चित्रकला ही ठाणे जिल्ह्यातील वारली या आदिवासी जमातीच्या नावावरून विशेषत: ओळखली जाते. डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर यांनी भारतीय भूप्रदेशातील प्रागैतिहासिक चित्रणे प्रकाशात आणली. तेव्हा वारली कलेचा कोणी एक जनक नव्हता, परंतु श्री. जीवा सोमा म्हसे यांनी ही वारली चित्रकला प्रकाशात आणली. त्यांनी वारली चित्रकला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली. त्यांनी आदिवासी जीवनशैली सोप्या प्रतिकांमधून चित्रित केली आहे. आदिवासींचे विविध सण, उत्सव, शेतीची कामे, मासेमारी, विवाह विधी इत्यादींचे चित्रण त्यात केलं. प्रथमतः वारली चित्रे ही मूळ स्थानापेक्षा वेगळ्या जगात सन १९६० साली आली.[१]

- **वारली चित्रकला – संकल्पना**

महाराष्ट्रातील कोकण विभागात वारली या आदिवासी जमातीची ही वैशिष्ट्यपूर्ण कला पहावयास मिळते. या कलेचे विशिष्ट नमुने ‘भिमबेटका’पासून संपूर्ण भारतात पहावयास मिळतात. ठाणे जिल्ह्यातील वारली या आदिवासी जमातीमधील चित्रकला ही संपूर्ण जगामध्ये ‘वारली चित्रकला’ या नावाने ओळखली जाते. वारली चित्रकला ही वारली जमातीचा सांस्कृतिक आरसा अथवा प्रतिबिंब आहे. या चित्रांतील आदिवासींच्या जीवनातील भाव-भावनांचे चित्रण हे फक्त कलेच्या क्षेत्रातीलच नाहीतर आदिवासींच्या संस्कृतीचा तो एक परमोच्च आविष्कार आहे.




**वारली चित्र**

**मूळ चित्रकार - अनिल चैत्या वांगड**[२]

१) पक्षी २) तारपा नृत्य ३) जात्यावरील दळण ४) घरातील दृश्य

५) नृत्य ६)लग्नाची वरात ७) धान्य उखळणे ८) कोंबड्या

९) बकऱ्या १०) ताडाचे झाड ११) भात लागवड १२) भात झोडणी

आदिवासींच्या आयुष्यातील विविध भावविश्व, त्यांची परंपरा, रीतीरीवाज, सण-उत्सव तसेच दैनंदिन जीवनाचे विविध प्रसंग त्यामध्ये असतात. यात वारली चित्राचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतेही चित्र हे स्वतंत्रपणे येत नाहीतर अनेक विषयांची विविधता त्यामध्ये समाविष्ट होत असते. वारली चित्रांमध्ये आदिवासींच्या विविध धार्मिक विधी, देव-देवता, झोपडी, गावदेव किंवा गावदेवीचे देऊळ, शेती, शेतीतील पशु, प्राणी, ताडी काढणारा भंडारी, गोलाकार तारपा नृत्य, वाघोबा तसेच सूर्यचंद्र आदींचे एकत्रितपणे चित्रणे असतात. निसर्गातील पशुपक्षी, साप, विंचू, खेकडा, मासे, डोंगरदऱ्या, झाडे, घरे, नदी, लग्नविधी, भातशेती आणि शेतीला पूरक असणारे पशु, कोंबडी, गाय, बैल, घोडा हे लघुउद्योग तसेच सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब. अशा विविध चित्रांच्या माध्यमातून ते रेखाटले जात असते. यातून वारली चित्रकाराची कल्पनाशक्ती आणि निसर्गाचे निरीक्षण हे अत्यंत सुबकतेने मांडलेले दिसून


येते. या चित्रशैलीमध्ये भौमितिक आकाराला अत्यंत महत्त्व असून त्रिकोण, चौकोन, आयत, वर्तुळ, अर्धवर्तुळ, पंचकोन व रेषा यांचा यात वापर अधिक केला जातो. प्रामुख्याने वारली जमातीच्या घरांच्या भिंतीवर सुगीचा हंगाम आणि विवाह सोहळा या निमित्ताने ही चित्रे साकारण्यात येतात. भिंतीवर चित्रे काढण्यासाठी ते तपकिरी माती आणि तांदळाचे पीठ यांचा वापर करतात. चुना, गेरू, शेणाच्या साहाय्याने त्यामध्ये रंग भरले जातात. याकरिता बांबूच्या काडीचा ब्रश म्हणून वापर करतात.[३]

**● वारली लोकांची चित्रात्मक भाषा**

वारली लोकांना अनेक समस्या आणि विविध आजारांना सामोरे जावे लागते. ते आजारांवर मात करण्यासाठी नेहमीच काही पारंपारिक विधी आणि जादूटोणा यांची मदत घेत असतात. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी ते त्यांच्या देव-देवतांना प्रसन्न करण्यासाठी त्यांची चित्रे काढतात. म्हणजेच मुख्यत: त्यांनी ही संस्कृती आपल्या देवाशी एकरूप होण्यासाठी विकसित केली आहे. वारली चित्रकार फक्त पौराणिक कथांचे चित्रण करत नाही तर त्यांच्या रोजच्या जीवनातील दृश्य आणि आसपासच्या परिस्थितीचे चित्रण करतात. वारली चित्रांमधे देवदेवता, कापणी हंगाम, प्राणी, संस्कारविधी यांचे चित्रण केलेले दिसून येते. बहुतेक मानवी आकृत्या या एकमेकांशी संवादात चित्रित केल्या जातात. सामाजिक जीवनातील दृश्य जसे की, शिकार, मेळावे, मासेमारी, शेती, जंगलातील क्रिया, त्यांच्या आसपासचे वातावरण आणि त्यांच्या देवावरची असणारी श्रद्धा इत्यादींचे वर्णन त्यांच्या चित्रांमध्ये अधिक स्पष्टपणे दिसून येते. वारली जमातीचे लोक त्यांच्या घरांच्या भिंतींना कापणीच्या दृश्यांनी, विवाह सोहळ्याने, जन्माच्या वेळी असणाऱ्या विविध विधी तसेच पावसाळ्याचे चक्र यासारख्या चित्रांनी रंगवतात. त्यांचे जीवन निसर्गाशी जवळून जोडलेले असल्यामुळे ते सूर्य, चंद्र, मेघगर्जना, वारा, पाऊस इत्यादी वेगवेगळ्या रूपात त्यांची पूजा करतात. सणासुदीच्या वातावरणात या चित्रांमध्ये मानव आणि प्राणी यांचे चित्रण करण्यात आले आहे. तारपा वाद्य वाजवणाऱ्या व्यक्ती भोवती स्त्रियांचा एक गट नाचतो, पुरुष आणि स्त्रिया कापणीचे दृश्य, शेती, शिकार आणि इतर अनेक क्रियाकल्पांमध्ये गुंतलेले असल्याचे चित्रित केलं जातं. वारली चित्रांमध्ये तारपा नृत्यात स्त्री-पुरुषांची वर्तुळाकार रचना दाखवणे हे वारली चित्रकलेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.[४]

ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीच्या लोकांमध्ये लग्नाच्या वेळेला भिंतीवर जे चित्र काढले जाते, त्याला 'लग्नाचा चौक' किंवा 'देव चौक' असे म्हणतात. ही चित्रे 'सुवासिनी' स्त्रियांद्वारे काढले जातात. त्यांना 'धवलेरी' असे म्हणतात. या चित्रात एक शिडी काढलेली असते, तिला 'निसन' असे म्हटले जाते. चौक काढताना सुरुवातीला कुटुंबातील कुलदेवतेच्या नावाने रेघ काढली जाते, तिला 'देवरेघ' म्हणतात. नंतर दुसरी रेघ वधू-वराची काढली

जाते. लग्न चौकमध्ये हिरवा, हिमाईदेवी, नारानदेव, दोन सिरे, पाच सिरे, गावदेव, सुंकेसर, चांदेसर, सुरेसर, देवांचा तांगड, पाच बैलांचा तांडा, मोर, निसन, फणी, बोंब्या वंजारी, हाक्या, लग्न मंडप आणि पाच चेडा यांचे चित्रण केले जाते.[५]




**वारली चित्र**

**मूळ चित्रकार - आकाश भिसीकर** [६]

१) घर २) पाणी शेंदणे ३) दोरी उड्या ४) फुले वेचणे ५) नगारा

६) बैलगाडी ७) मडक्याची उतरंड ८) धान्य कांडणे ९) लाकडे फोडणे

१०) चंद्र

वारली पेंटिंगमध्ये आपण झाडांच्या जवळपास तीन ते पाच जातींचे निरीक्षण करू शकतो. मोर हा एक सामान्य पक्षी वारली पेंटिंगमध्ये दिसतो. सूर्य हा नेहमी तेजस्वी म्हणून दर्शविला जातो तर प्रत्येक मानवी आकृती ही नेहमी हालचाली आणि गतिमान म्हणून दर्शविली जाते. कारण त्यांचं दैनंदिन कार्य अथवा जीवन हे सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत शेती आणि इतर कामांशी संबंधित आहे. उडणाऱ्या पक्षाचे चित्र त्यांच्या जन्मजात जीवनातील गतिमानता सांगते. पालाघाट देवीची चित्रे काढल्याशिवाय विवाह विधी होत नाहीत. असे मानले जाते की, ही देवी दृष्ट्य आत्म्यांपासून वधू आणि वराचे संरक्षण करते आणि प्रजनन क्षमतेचे आशीर्वाद देते.[७]

**● वारली चित्रकलेचे तंत्र**

त्रिकोण, चौकोन, वर्तुळ यासारख्या भौमितिक आकाराने वारली चित्रे काढली जातात. आदिवासी वारली लोक हे पिढ्यानपिढ्या या वारली चित्रांचा सराव करतात. या जमातीला वारली चित्रकलेसाठी कोणतेही असे औपचारिक प्रशिक्षण दिले जात नाही. जुन्या पारंपारिक पद्धतीनुसार ते फक्त माती आणि शेणाच्या पृष्ठभागावर चित्र काढतात. प्रथम गेरू आणि नंतर तांदूळाच्या पिठाने चित्र रेखाटलं जातं. ही चित्रे साधी जरी वाटत असली तरी ही त्यांच्या साधेपणाच्या जीवनाचं चित्रण त्यामधून सूक्ष्मपणे दिसून येते. भित्तिचित्र हे आदिवासी कलेचे सर्वात सोपे माध्यम आहे. ज्यामध्ये मुख्यत: पक्षी, प्राणी यासारख्या भौमितिक आकारांचा समावेश होत असतो. त्यांच्या चित्रांमध्ये त्यांच्या रोजच्या जीवनातील घडामोडी आणि लग्नाची दृश्य ही सामान्य गोष्ट आहे.

**● समारोप**

भारतामध्ये पूर्वीपासून अनेक कलाप्रकार आहे. जे देशाची वारसा आणि परंपरा दर्शवतात. वारली चित्रकला ही त्यापैकीच एक. वर्षानुवर्षे मुख्य प्रवाहात संस्कृतीशी त्यांचा वाढता संपर्क आणि त्यांच्या चालीरीतीऐवजी व्यावसायिक मूल्य वाढत गेल्याने ही कलाही वारली पुरुषांच्या हाती लागली आहे. त्यांची कला वनस्पती आणि प्राणी तसेच त्यांच्या जवळचा परिसर आणि दैनंदिन क्रिया यांच्या जीवनावर केंद्रित आहे. केवळ कॅनव्हासवरच नव्हे तर त्यांची कला ही घरातील वस्तू जसे की, वॉल हैंगिंग्स, लॅम्प शेड्स, टेबल, कपडे, चहाचे मग इत्यादींवरही दिसून येते. वारली कलेची मौलिकता जपली पाहिजे आणि त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. स्लाइड्स, लघु चित्रपट, कलाकार आणि कारागीर यांनी एकत्रितपणे काम करून संग्रहालय आणि खाजगी कला दालनांमध्ये प्रदर्शनासारख्या दस्तऐवजीकरणाद्वारे ते जतन केले पाहिजे. सुदैवाने भारत सरकार तसेच आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे व इतर स्वयंसेवी संस्था या चित्रांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी अनेक प्रयत्न व उपाय योजना करत आहे.

**● निष्कर्ष**

१. चित्रकलेतून आदिवासी वारली समाजाने आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक बारकावे मांडले आहे. हे चित्र त्यांच्या समग्र जीवनाचे प्रतिबिंब मांडते.

२. धार्मिक कार्य आणि विशिष्ट विधीच्या वेळी ते चित्र रेखाटत असतात. त्यामुळे त्यांच्या जगण्यात चित्राचे अलौकिक स्थान आहे.

३. या चित्रासाठी नेहमीच नैसर्गिक रंगाचा म्हणजेच तांदळाचे पीठ, शेण, गेरू, चुना यांचा वापर केला असल्याने ते अधिक सुबक व सुंदर दिसते.

**● संदर्भ सूची**


१. Jain Navinchandra, Tribhuvan Robin, ‘Strategies for promotion and Propagation of Tribal art and handicrafts’, Tribal Research and Training Institute Pune,1996.

२. संशोधन संकेतस्थळ : http:www.waralipaintings.com.

३. गारे गोविंद, ‘वारली चित्र संस्कृती’, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वि. आ, ऑक्टो २००३.

४. ठाणकर संपत, ‘वारली चित्रकला भाग-३’, रतन प्रिंटर्स, डहाणू, जि. पालघर, २०१५.

५. राजपूत भगवान, ‘आदिवासी समाज लोकजीवन व लोकसाहित्य’, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१७.

६. संशोधन संकेतस्थळ : http:www.waralipaintings.com.

७. ठाणकर संपत, ‘वारली हृदय’, जीतगाव, डहाणू, जि. २००८.